महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१२-१३ या वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २३ मे, २०१४

वाचा : १) शासन निर्णय क्र. रोहयो-२००८/प्र.क्र.६५/रोहयो-१, दि. २४ सप्टेंबर,२००८

२) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१२

**प्रस्तावना :**

सन २०१३ मध्ये राज्यातील काही भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-यांच्या विहिरी गाळाने बुजलेल्या आहेत तर काही शेतक-यांच्या विहिरी खचलेल्या आहेत. त्यामुळे शेतक-यांना पुढील हंगामात पाण्याविना पिक घेणे शक्य होणार नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा संदर्भाधीन दिनांक २४ सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर अशा विहिरींची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दुरुस्ती करण्याबाबत मागणी होत आहे. तदनुसार यासंदर्भात शासन खालील सूचना देत आहे.

## शासन निर्णय :-

राज्यात सन २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींसंदर्भात खालीलाप्रमाणे कार्यवाही करण्यास शासन मान्यता देत आहे.

**बुजलेल्या विहिरी :-**

जिल्हयात अतिवृष्टीमुळे बुजलेल्या विहिरींची कृषि व महसूल खात्याच्या अधिका-यांनी संयुक्तरित्या पंचनामा करुन निश्चिती करावी. तसेच बुजलेल्या विहिरींची नोंद ७/१२ वरुन कमी करण्याबाबत महसूल व वन विभागाने दिलेल्या सविस्तर सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

**खचलेल्या विहिरी :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय गामीण रोजगार हमी कायदयातील अनुसूची-१ मधील परिच्छेद ४ ( II ) ( i ) अन्वये विशिष्ट प्रवर्गासाठी सिंचन सुविधा म्हणून विहिरींची कामे अनुज्ञेय आहेत.

तदनुसार अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय गामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यास शासन खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

अ) जिल्हयात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांच्या विहिरींची कृषि व महसूल खात्याच्या अधिका-यांनी निश्चित करावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

आ) खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करावे. मात्र, अंदाजपत्रकाची कमाल मर्यादा रुपये १,५०,०००/- इतकी असावी. सदरहू अंदाजपत्रकास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार तांत्रिक व प्रशासकिय मान्यता घ्यावी. अशा कामांचा शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१२ अन्वये स्थापन केलेल्या विभागीय स्तरावरील तांत्रिक समितीने प्रत्येक महिन्याला आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविणे अनिवार्य राहिल.

इ) सदर कामे करतांना ग्रामसभेची शिफारस व ग्रामपंचायतीची मान्यता आवश्यक राहील व दुरुस्ती ग्रामपंचायतमार्फत असेल तर ग्रामपंचायत स्तरावर व यंत्रणेमार्फत असेल तर गट स्तरावर ६० : ४० चे मजुरी व साहित्याचे प्रमाण राखणे आवश्यक राहिल.

ई) खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तींची कामे करतांना कामांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व मार्गदर्शक तत्वाचे पालन करणे अनिवार्य राहील.

उ) खचलेल्या विहिरींची कामे घेतांना पुढील प्रवर्गातील कुटुंबाना प्राधान्य देण्यात यावे:-

अ) अनुसूचित जाती :

ब) अनुसूचित जमाती :

क) भटक्या जमाती :

ड) निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) :

इ) दारिद्रयरेषेखालील इतर कुटूंबे :

फ) स्त्री-कर्ता असलेली कुटूंबे :

ग) शारीरिकदृष्टया अपंग व्यक्ती कर्ता असलेली कुटूंबे :

ह) जमीन सुधारणांचे लाभार्थी :

आय) इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी :

जे) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) खालील लाभार्थी आणि -

उपरोक्त प्रवर्गामधील पात्र लाभार्थींना प्राधान्य देण्यात आल्यानंतर, कृषि कर्जमाफी व कर्ज सहाय्य योजना, २००८ यामध्ये व्याख्या केलेल्या लहान व अल्पभूधारक शेतक-यांना प्राधान्य देण्यात यावे.

ऊ) खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे माहे ३१ डिसेंबर, २०१४ अखेरपर्यन्त पुर्ण करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्राच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०५२३१५४६५३४११६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

23/5/2014

(आर. विमला)

**उप सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.

मुख्य सचिवांचे स्वीय सहायक

अतिरिक्त मुख्य सचिव

शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर

सर्व विभागीय आयुक्त.

सर्व जिल्हाधिकारी

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे

सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)

कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)

सर्व उपसचिव / अवर सचिव / का.अ. (रोहयो)/ निवडनस्ती (रोहयो.१)